# सापळा केस

दिनांक १६/०३/२०२२

**आलोसे अनिल संभाजीराव खिल्लारे, वय ४५ वर्षे, ग्रामसेवक, सज्जा पारवा ता.जि.परभणी (वर्ग–३), यांनी ९,०००/– रू लाच मागणी करून स्विकारल्याची यशस्वी सापळा कारवाई**

यातील तक्रारदार यांनी लाप्रवि कार्यालय परभणी येथे दि. १६/०३/२०२२ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, यातील तक्रारदार यांनी वेदांतवाडी मध्ये प्लॉट क्र.११४ विकत घेतलेला असुन सदर प्लॉटची नोंद नमुना नंबर आठ वर घेण्यासाठी पारवा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांना १०,०००/– रू लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी ग्रामसेवक यांना एवढे पैसे लागत नसल्याचे सांगीतले. परंतु त्यांनी ऐकले नाही व १०,०००/– रू लागतील असे सांगीतले. तरी तक्रारदार यांना ग्रामसेवकास लाच देण्याची मुळीच इच्छा नाही त्यावरुन त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १६/०३/२०२२ रोजी तक्रारदार यांना त्यांचे वेदांतवाडी मध्ये विकत घेतलेल्या प्लॉट क्र.११४ ची नोंद नमुना नंबर आठ वर घेण्यासाठी ग्रामपचायत पारवाचे ग्रामसेवक यांनी १००००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ९०००/– रू लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगीतले.

त्यावरुन लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीमध्ये आलोसे अनिल संभाजीराव खिल्लारे, वय ४५ वर्षे, ग्रामसेवक, सज्जा पारवा ता.जि.परभणी यांनी तक्रारदार यांनी वेदांतवाडी मध्ये विकत घेतलेल्या प्लॉट क्र.११४ ची नोंद नमुना नंबर आठ वर घेण्यासाठी ९०००/– रू लाचेची रक्कम स्विकारली आहे. म्हणून त्यांचे विरूध्द पो.स्टे नवामोंढा येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक डॉ. श्री. राहुल खाडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री. धरमसीग चव्हाण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी पोलीस उप अधिक्षक श्री. किरण बिडवे, पोलीस निरीक्षक श्रीमती. स्वप्नाली धुतराज पोह/हनुमंते, घाग, निलपत्रेवार, पोना/कटारे, कुलकर्णी, शेख मुखीद, पोशि/धबडगे, पोशि/चट्टे, पोशि/शेख मुक्तार, चापोना/कदम, ए.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

मा.डॉ. श्री. राहुल खाडे, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड – ८८८८८०७२९९
मा.श्री.धरमसीग चव्हाण, अप्पर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड – ९९२३४९७०७६
श्री.किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी – ७०२०२२४६३१
श्रीमती.स्वप्नाली धुतराज, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी – ८३०४२४१९००

Scanned with CamScanner